महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
■ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ■ ऑटोमोबाईल टेक्निशियन
■ इलेक्ट्रिकल वायरमन ■ मोटार वायडिंग
■ टू-व्हीलर मेकॅनिक ■ फोर व्हीलर मेकॅनिक
■ A.C. मेकॅनिक ■ वेल्डर / फ्लंबर
■ कॉम्प्युटर ऑपरेटर ■ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ६३ वा | गुरुवार, दि. २५ सप्टेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# पुराच्या पाण्यात वाहून गेली महायुती सरकारची संवेदना

## ओल्या दुष्काळाने शेतकरी कोलमडला, मंत्र्याचा मात्र पर्यटन दौरा?

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** खरे तर सप्टेंबर-ऑक्टोबर हे खरीप सुगीचे अन सणवारांचे महिने आहेत. खरिपातील पिके हाती आलेली असतात. त्यातून सणवारांचा आनंद द्विगुणित होतो. परंतु या वर्षी शेतशिवारात पावसाने थैमान घातले असून, शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे.











या वर्षीची ही काही पहिलीच आपत्ती नाही. जुलै, ऑगस्ट आणि आता सप्टेंबर या तिन्ही पावसाळी महिन्यांत अतिवृष्टीने पिकांचे अतोनात नुकसान केले आहे.

अनेक ठिकाणी काढणीला आलेले सोयाबीन पाण्यात आहे. कापसाची बोंडे शेतात साठलेल्या पाण्यात सडत आहेत. नदी-नाले परिसरात पिकांबरोबर शेतातील माती, पशू-पक्षी याबरोबर ट्रॅक्टर, कडबा कुट्टी, सोलर पंप, खते-धान्यांची पोते, सूक्ष्म सिंचन संच आदी साहित्य वाहून गेले आहे. काही ठिकाणी जीवितहानीसुद्धा झाली आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानीचा आकड्यांत अंदाज बांधणे कठीण आहे.

राज्यभरात अतिवृष्टी झाली असली, तरी मराठवाड्यासह अहिल्यानगर, सोलापूर या भागांना तडाखा अधिक बसला आहे. राज्यात खरिपाचे क्षेत्र १४४ लाख हेक्टर आहे. त्यापैकी सुमारे १३५ लाख हेक्टरवर पेरा होतो. त्यातील २६ लाख हेक्टर (२० टक्के) क्षेत्र अतिवृष्टीने बाधित झाले आहे. वैयक्तिक शेतकऱ्यांबरोबर राज्याचीही ही मोठी हानी आहे.

मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव यांनी अतिवृष्टी व पूरग्रस्तांसाठी मदत निधीची घोषणा केली आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी ही मदत शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीच मिळणार असल्याचे स्पष्ट केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तर सप्टेंबरअखेर अथवा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात मदतीची ग्वाही दिली आहे. परंतु या सर्व घोषणा औपचारिक असतात. नैसर्गिक आपत्तींमध्ये आतापर्यंत शेतकऱ्यांना आलेला अनुभव वेगळाच आहे.

नुकसानग्रस्त भागांचे नीट पाहणी-पंचनामे होत नाहीत. शासनाची मदत अनेकांपर्यंत पोहोचत नाही. ज्यांना मदत मिळाली तिही तुटपुंजी असते. या वर्षी पीकविम्याला थोडा कमीच प्रतिसाद मिळाला. त्यातही नुकसानीचे महत्त्वाचे ट्रिगर्स कमी केल्यामुळे विमा भरपाई मिळण्याच्या आशाही कमी झाल्या आहेत. शासकीय मदत जुन्या निकषांप्रमाणे मिळणार असल्याने त्यातून शेतकऱ्यांना फारसा दिलासा मिळणार नाही.

या वर्षीच्या संकटाकडे शासन-प्रशासनाला नेहमीचे संकट म्हणून पाहू नये. आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या नोकरदाराला महिन्याचा पगार दिला नाही तर घर कसे चालणार म्हणून ओरड सुरू होते. येथे तर मागील तीन-चार वर्षांपासून राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांचे सातत्याच्या नैसर्गिक आपत्तींनी पूर्ण पीक वाया जात असताना त्यांनी घरसंसाराचा गाडा कसा चालवायचा, हा खरा प्रश्न आहे.

राज्यात अतिवृष्टीच्या निकषांत बदल करा, सरसकट कर्जमाफी करा, अशा मागण्या शेतकरी करीत आहेत. सरासरीपेक्षा १० टक्क्यांहून कमी पावसाला अवर्षण, तर १० टक्क्यांहून अधिक पावसाला अतिवृष्टी म्हणून संबोधले जाते. यानुसार अतिवृष्टीजन्य परिस्थिती राज्याच्या अनेक भागांत आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन जुन्या-नव्या निकषांनुसार नाही तर झालेल्या नुकसानीच्या प्रमाणात भरपाई अथवा मदत मिळायला हवी.

एवढेच नाहीतर शेतकऱ्यांची कर्जमाफी, शैक्षणिक फी माफी आदी सवलती त्यांना मिळायला हव्यात. असे झाले तरच या आपत्तीत तो तग धरणार आहे. बदलत्या हवामान काळात सातत्याच्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे नुकसान वाढत आहे. अशा वेळी ओल्या दुष्काळावर नव्याने विचार करावा लागणार आहे. भरपाईचे निकषही नव्याने ठरवावे लागतील. असे झाले तरच अतिवृष्टी अथवा ओल्या दुष्काळात शेतकऱ्यांना दिलासा मिळेल.

**ओल्या दुष्काळाने शेतकरी कोलमडला, मंत्र्याचा मात्र पर्यटन दौरा?**

मराठवाड्यासह सोलापूर जिल्ह्यात पावसाने थैमान घातले आहे. शेतकऱ्यांची प्रचंड नुकसान झाले आहे. हाताशी आलेले पीक पाण्यात गेले. घरं कोसळली आहेत. सरकारने ओला दुष्काळ जाहीर करावा म्हणून मागणी करण्यात येत आहे. त्यातच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह मंत्रांनी पावसाने झालेल्या नुकसानीची पाहणी दौरे सुरू केले आहेत.

मंत्र्याचे नुकसान पाहणी दौरा आहे की पर्यटन? असा संतप्त सवाल आमदार रोहित पवार यांनी विचारला आहे. मंत्री संजय शिरसाट यांचा बुधवार (ता.24) सोलापूर जिल्हा दौरा जाहीर झाला आहे. या दौऱ्यात अतिवृष्टीच्या पाहणीसाठी 1 तास आणि पक्ष संघटनेसाठी 6 तास राखीव आहेत. म्हणजे शिरसाटसाहेब पक्ष संघटनेच्या बैठकीतून केवळ पाय मोकळा करण्यासाठी येणार आहेत का? ही शेतकऱ्यांची थट्टा नाही तर काय आहे? असा सवाल रोहित पवार यांनी विचारला आहे.

'हे मंत्री शेतकऱ्यांचे अश्रू पुसणार आहेत की त्याच्या जखमेवर मीठ चोळणार आहेत? अशा 'पर्यटन' मंत्र्यांच्या दौऱ्यांची शेतकऱ्यांना कदापि गरज नाही. अशा फालतू दौऱ्यापेक्षा सरकारने ओला दुष्काळ जाहीर करावा, कर्जमाफी द्यावी आणि शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार मदत द्यावी, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.

जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून पाऊस अतिवृष्टी, तसेच भीमा व सीना नदीला आलेल्या महापुरामुळे माढा करमाळा मोहोळ पंढरपूर उत्तर सोलापूर दक्षिण सोलापूर या अनेक गावांमधील नागरिक पुराच्या पाण्यात अडकलेले आहेत.

एवढेच नव्हे, तर या पुराच्या पाण्याचे महावितरणचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. ५६ गावे अंधारात असून, ३८०० वाहिन्यांचे नुकसान झाले आहे. उपकेंद्र अन ट्रान्सफॉर्मर पाण्यात असल्याची विदारक स्थिती दिसून येत आहे.

दरम्यान, सातत्याने महापुराचे पाणी गावात शिरत असल्याने गावाशेजारील ट्रान्सफॉर्मर पाण्यात आहेत. पुढील धोका ओळखून उपकेंद्रातून त्या ट्रान्सफॉर्मरचा वीजपुरवठा महावितरणने खंडित केला आहे. महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने, माढा, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, करमाळा, मोहोळचे कार्यकारी अभियंता गावागावांना भेटी देऊन परिस्थितीचा आढावा घेत आहेत. शिवाय वीजयंत्रणेपासून दूर राहण्याच्या सूचनाही महावितरणकडून वेळोवेळी बाधित गावातील लोकांना देण्यात येत आहेत.

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

## मुख्यमंत्री फडणवीस यांची सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त भागाची पाहणी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले दिसून येत आहे. शेती पिकांचे जनावरांचे घरांचे व्यावसायिकांचे खूप मोठे नुकसान झालेले असून पूरग्रस्त नागरिकांनी अशा संकटाच्या काळात धीर धरावा, राज्य शासन संकटकाळात पूरग्रस्तांच्या पूर्णपणे पाठीशी असून नागरिकांना सवोतीपरी मदत केली जाणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर जिल्ह्याच्या माढा तालुक्यातील निमगाव तसेच दारफळ सीना या गावाला भेट देऊन पुरामुळे झालेल्या नुकसानाची पाहणी केली, त्यांनी दोन्ही गावातील नागरिकांशी संवाद साधला. याप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार रणजीत मोहिते पाटील, आमदार अभिजीत पाटील, विभागीय आयुक्त डॉ चंद्रकांत पुलकुंडवार, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर, माजी आमदार राम सातपुते, जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अतिवृष्टी व पूर आल्यामुळे ग्रामस्थांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या सर्वांना शासनाकडून मदत दिली जाणार आहे. नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पूरग्रस्तांना तातडीची मदत म्हणून दोन हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यापुढेही पूरग्रस्तांना आवश्यक मदत देण्यासाठी शासन हात आखडता घेणार नाही. शासन टंचाई काळात ज्या निकषाप्रमाणे मदत करते त्याप्रमाणेच अती पावसात, ओल्या दुष्काळात ही मदत केली जाईल, असे त्यांनी सांगितले.


दारफळ गावात पुरामुळे मोठे नुकसान झाले असून नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने नदीने पात्र बदलले आणि गावाचा मोठा भाग पाण्यात गेला, तसेच लोकांच्या घरात पाणी शिरले. त्यामुळे घरांचे, अन्नधान्याचे नुकसान झाले आहे. शेती, जनावरांचे नुकसान झाले आहे. शासन शेती, घरादारांकरिता, अन्नधान्य आदींसाठी मदत करणार असून रस्ते, शाळा, शेतरस्ते, वीजव्यवस्था आदी सुविधांसाठीही आवश्यक ती सर्व मदत करणार आहे. व्यावसायिकांनाही नुकसानीसाठी स्वतंत्र मदत करण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माढा तालुक्यातील निमगाव येथे नुकसानीची पाहणी केली आणि नागरिकांच्या व्यथा जाणून घेतल्या. या संकटातून बाहेर पडण्यासाठी नागरिकांना आवश्यक मदत करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

## पूरग्रस्त शेतकऱ्याने थेट मुख्यमंत्र्यांची गाडी अडवली



**माढा (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे शेती आणि घरांचे मोठे नुकसान झाले आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात पूरग्रस्त भागाचा दौरा केला. या दौऱ्यादरम्यान माढ्यात एका शेतकऱ्याने थेट मुख्यमंत्र्यांची गाडी अडवून आपला संताप व्यक्त केला. (पान 2 वर..)

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अ‍ॅण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
NGO DARPAN
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार

नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

## पूरग्रस्त लांबोटी गावाला उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मोहोळ तालुक्यातील लांबोटी गावाला भेट देऊन अतिवृष्टी व धरणातून झालेल्या पाण्याच्या विसगार्मुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. नदीकाठच्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे लक्षात घेता, शासनाकडून तातडीने पंचनामे करून पुरग्रस्तांना मदत दिली जाईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि धरणातून दोन लाख क्युसेक्स पाण्याचा विसर्ग झाल्यामुळे लांबोटी परिसरात पूरस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे शेतजमिनी, घरे, मंदिरांचे मोठे नुकसान झाले असून अनेक शेतकऱ्यांचे पिकेही नष्ट झाली आहेत. पुराच्या पाण्यात अडकलेल्या सुमारे सव्वाचार हजार नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. जनावरे वाहून गेलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून योग्य ती मदत दिली जाईल, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी स्पष्ट केले.



सोलापूर-पुणे महामार्गावरील लांबोटी येथील पुलावरून पाणी पातळी वाढल्यामुळे जड वाहतुकीस सुरक्षेच्या कारणास्तव बंदी घालण्यात आली असून अत्यावश्यक सेवा एकेरी मार्गाने सुरू ठेवण्यात आल्या आहेत. पूरग्रस्तांना लवकरात लवकर मदत मिळावी यासाठी शासन प्रयत्न शील असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या पाहणी दौऱ्यात निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर, महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील, मोहोळचे आमदार राजू खरे, जिल्हा दूध संघाचे माजी संचालक सज्जन पाटील यांच्यासह नागरिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अतिवृष्टी व पुरामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरच मदत : उपमुख्यमंत्री अजित पवार

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टी व सीना नदीला आलेल्या पुरामुळे शेती, घर व पशुधनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, बाधित शेतकऱ्यांना शासनातर्फे लवकरच मदत दिली जाईल, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

कोर्टी (ता. करमाळा), मुंगशी (ता. माढा), लांबोटी (ता. मोहोळ) या भागांतील पूरग्रस्त परिस्थितीची पाहणी उपमुख्यमंत्री पवार यांनी केली. यावेळी आमदार नारायण आबा पाटील, अपर जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता धीरज साळी, जिल्हा पुनर्वसन अधिकारी सुशांत बनसोडे, प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार आदी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, करमाळा, माढा, मोहोळ तालुक्यातील अनेक भागांमध्ये अतिवृष्टी व पुरामुळे प्रचंड नुकसान झाले असून राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. पुरात अडकलेल्या नागरिकांचे सुरक्षित स्थळी पुनर्वसन करावे, त्यांना अन्न, पाणी, वीज व औषधांची सुविधा पुरवावी, तसेच ज्यांचे धान्य भिजले आहे त्यांना तात्काळ धान्य उपलब्ध करून द्यावे, अशा स्पष्ट सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे उडीद, मका, सोयाबीन, तूर आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, घरांचे व पशुधनाचेही नुकसान झाले आहे. सर्व नुकसानग्रस्त घटकांचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत, असे निर्देशही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले.

पूर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या नागरिकांसाठी महामुनी मंगल कार्यालय, संगोबा रोड, करमाळा येथे तात्पुरते पुनर्वसन केंद्र उभारण्यात आले असून उपमुख्यमंत्री पवार यांनी त्या ठिकाणी भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. यावेळी शेतकऱ्यांनी ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली.

## संपादकीय

# सवलतीचा बोलबाला

देशात कालपासून नवीन जीएसटी स्लॅबची अंमलबजावणी सुरू झाली. त्यातून अनेक ग्राहक उपयोगी आणि जनसामान्यांच्या गरजेच्या वस्तू काही प्रमाणात स्वस्त झाल्या आहेत. हा बचत उत्सव असल्याचे मोदी सरकारचे म्हणणे आहे. अर्थात, एक गोष्ट खरी आहे की, या सरकारकडून जनतेच्या थेट उपयोगी पडेल अशी घोषणा बऱ्याच अवधीनंतर झाली आहे. केंद्र सरकारने 12 टक्के आणि 28 टक्के दराचे जीएसटी स्लॅब काढून टाकले, त्याऐवजी आता केवळ 5 टक्के आणि 18 टक्के या दोन दराचे स्लॅब कायम राहतील. अति महागड्या चैनीच्या वस्तू आणि सिगारेट, तंबाखू तसेच काही विशिष्ट प्रकारची पेय यांच्यावर मात्र तब्बल 40 टक्के दराने जीएसटी करवसुली सुरू राहणार आहे.

सिगारेट आणि तंबाखूजन्य पदार्थ यांचा उल्लेख सरकारने पापजन्य पदार्थ असा केला असून या पापजन्य पदार्थांवर हा 40 टक्क्यांचा कर लागू असेल. 28 टक्के दराने ज्यावर जीएसटी आकारला जात होता, अशा बहुतांश वस्तूवर आता 18 टक्के दराने आणि पूर्वी ज्या वस्तूंवर 18 टक्के दराने जीएसटी आकारला जात होता त्यावर आता 12 टक्के दराने जीएसटी आकारला जाईल. म्हणजेच त्या प्रमाणात विविध वस्तूंचे दर कमी होतील. छोट्या कार, दुचाकीपासून अनेक इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि अन्य ग्राहक उपयोगी वस्तू त्यामुळे स्वस्त होतील. ही कमालीची स्वस्ताई असल्याचे सरकारकडून भासवले जात आहे, परंतु वस्तुस्थिती नेमकी तशीच आहे का यावर तज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत.

या निर्णयामुळे सर्वसामान्य कुटुंबाचे वर्षाला कमीत कमी 30 ते 40 हजार रुपये वाचतील, असा सरकारचा दावा आहे. सरकारी महसुलात या निर्णयामुळे किती तूट येईल यावरसुद्धा वेगवेगळे दावे सुरू आहेत. काही जणांच्या मते, या सवलतीमुळे जीएसटी महसुलात सुमारे 40 हजार कोटींची घट होईल तर काही जणांच्या मते ही घट एक लाख कोटी रुपयांच्या वर जाईल. 22 तारखेला नवरात्रीच्या सुरुवातीच्या दिवशी हा निर्णय लागू होणार असल्याने पंतप्रधान मोदी यांनी त्याच्या आदल्या दिवशी सायंकाळी पाच वाजता देशाला संबोधित करून ही जीएसटी कपात म्हणजे नागरिकांसाठी 'बचत उत्सव' असल्याचे नमूद केले होते. त्यावर आता विरोधी पक्षांकडून वेगळी प्रतिक्रियाही उमटली आहे. जीएसटी कपात हा जर बचत उत्सव असेल तर गेली आठ वर्षे ज्या दराने लोकांकडून जीएसटी वसूल केला जात होता तो 'लूट महोत्सव' होता का, असा प्रश्न मोदी सरकारला विचारला जात आहे. मुळात जीएसटी ही संकल्पना सगळे कर रद्द करून एकच सुटसुटीत दराचा कर लागू करावा यासाठी अमलात आणली गेली होती. या जीएसटी करपद्धतीला नरेंद्र मोदी यांचा ते गुजरातचे मुख्यमंत्री असताना विरोधच होता. जीएसटी करपद्धती देशात यशस्वीच होऊ शकत नाही असे त्यांचे वक्तव्य असलेले व्हिडिओ सध्या फिरत आहेत. अरुण जेटली यांनी तर यूपीए सरकार आणू इच्छित असलेल्या जीएसटी कर पद्धतीचा, टॅक्स टेररिझम असा उल्लेख केला होता. हा सगळा इतिहास आपण दुर्लक्षित करू, पण सरकारकडे सुरुवातीपासून जीएसटीची कररचना अधिक सोपी आणि कमीत कमी टप्प्यांची असावी असा जो आग्रह विरोधी पक्षांकडून विशेषतः काँग्रेसकडून धरला जात होता त्याकडे मोदी सरकारने सुरुवातीपासूनच दुर्लक्ष केले आणि तब्बल सुमारे आठ वर्षे पाच टप्प्यांतील स्लॅबनुसार लोकांकडून कर वसुली केली गेली ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

या करातून सरकारने जनतेचे सुमारे 55 लाख कोटी रुपये लुटले अशी ही एक आकडेवारी पुढे केली जात आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर सरकारला उशिरा का होईना जाग आली याबद्दल त्यांचे अभिनंदनच करावे लागेल. पण हे करत असताना फार उर बडवून त्याचाही इव्हेंट करावा अशी ही परिस्थिती नक्कीच नाही. जीएसटी लागू करणे हा मोदी सरकारचा मास्टर स्ट्रोक आणि जीएसटीचे टप्पे कमी करणे हाही मोदी सरकारचा मास्टर स्ट्रोक अशी डबल ढोलकी, सरकारच्या कच्छपी लागलेल्या वाहिन्यांकडून सुरू आहे. त्यामुळे या स्लॅब कपातीला सरकार जर बचत उत्सव म्हणत असेल तर आतापर्यंत ज्या दराने जीएसटी करवसुली केली गेली त्याचा उल्लेख विरोधकांकडून लूट महोत्सव असाच केला जाणे स्वाभाविक आहे.

अर्थात, उशिरा का होईना एक बरे झाले की महागाईने त्रस्त झालेल्या जनतेला यातून थोड्याफार प्रमाणात का होईना दिलासा मिळणार आहे. आता या नवीन करपद्धतीचा नेमका ग्राहकांना किती लाभ होईल यावर तज्ज्ञांची चर्चा ठिकठिकाणी सुरू झालेली दिसते. काहीजणांनी यात असा मुद्दा उपस्थित केला आहे की ज्या वस्तू 18 टक्क्यांवरून 12 टक्के स्लॅबमध्ये घातल्या गेलेल्या आहेत त्या वस्तूंच्या निर्मितीसाठी जो कच्चामाल लागतो त्याच्यावरचा जीएसटी मात्र वाढीव दरानेच आकारला जात असल्याने त्या वस्तूंचे निर्मिती मूल्य कमी होणार नाही, त्यामुळे ग्राहकांना त्यांचा प्रत्यक्ष फार फायदा होईल असे नाही. जीएसटी सवलतीचे नेमके परिणाम फेब्रुवारी, मार्चच्या सुमाराला दिसून येतील. यात ग्राहकांना नेमका किती लाभ झाला आणि सरकारचा किती महसूल तोटा झाला हे त्यावेळीच लक्षात येईल. तोपर्यंत जीएसटी सवलतीचा आणि बचत उत्सवाचा बोलबाला असाच चालू राहील.

# जागतिक स्वप्न दिन : स्वप्नांतून साकार होणारे वास्तव

मानवजातीच्या इतिहासाचा वेध घेतला असता एक गोष्ट स्पष्ट दिसते की जग बदलण्याची, नव्याने घडवण्याची आणि मानवतेला नवी दिशा देण्याची प्रेरणा नेहमीच स्वप्नांतून जन्म घेत आलेली आहे. झोपेत पाहिलेली क्षणभंगुर चित्रे ही खरी स्वप्ने नाहीत, तर जेव्हा एखादी कल्पना, ध्येय किंवा आकांक्षा मनात दृढतेने आकार घेते आणि त्यासाठी व्यक्ती अथवा समाज कृतीशील होतो, तेव्हा त्याला खरे स्वप्न म्हणता येते. हाच संदेश संपूर्ण जगात पोहोचवण्यासाठी दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी ह्यजागतिक स्वप्न दिनह्ण साजरा केला जातो. हा दिवस लोकांना त्यांच्या वैयक्तिक व सामूहिक स्वप्नांचा विचार करण्यास, त्यांना कृती आराखड्यात रूपांतरित करण्यास आणि जीवनाला तसेच समाजाला परिवर्तनाच्या मार्गावर नेण्यास प्रेरणा देतो. 'जागतिक स्वप्न दिन' ही संकल्पना प्रथम २०१२ साली अमेरिकन अभ्यासक ओझिओमा एग्वुओनवू (Ozioma Egwuonwu) यांनी मांडली. त्यांना विश्वास होता की प्रत्येक व्यक्तीमध्ये स्वप्न पाहण्याची क्षमता असते आणि ही स्वप्ने वैयक्तिक प्रगतीसोबतच सामाजिक, राष्ट्रीय व जागतिक प्रगतीसाठीही मार्गदर्शक ठरू शकतात. त्यांच्या पुढाकारातून २५ सप्टेंबर हा दिवस अधिकृतपणे 'जागतिक स्वप्न दिन' म्हणून साजरा होऊ लागला. सुरुवातीला शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि काही देशांत या दिवसाचे औचित्य साधून उपक्रम राबवले गेले, पण हळूहळू त्याला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.

मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून स्वप्ने ही मानवी मनाची प्रेरणाशक्ती आहेत. जेव्हा एखादा युवक आपल्याला डॉक्टर, शास्त्रज्ञ, कलाकार किंवा नेता बनायचे आहे असे स्वप्न पाहतो, तेव्हा तेच स्वप्न त्याच्या अभ्यासाला दिशा देते, जीवनात अनुशासन आणते आणि त्याच्या वर्तनाला नवा अर्थ देते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता स्वप्ने ही सामूहिक चेतना घडविण्याचे कार्य करतात. समाजातील मोठ्या आंदोलनांचा आणि क्रांतींचा उगम सामूहिक स्वप्नांतूनच झालेला आहे. महात्मा गांधींनी लोकांच्या मनात स्वराज्याचे स्वप्न रुजवले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतेचे, न्यायाचे आणि बंधुत्वाचे स्वप्न मांडले, तर नेल्सन मंडेलांनी वर्णभेदमुक्त दक्षिण आफ्रिकेचे स्वप्न लोकांसमोर ठेवले. या सर्व स्वप्नांमधून जनसमूह प्रेरित झाले आणि सामाजिक-राजकीय क्रांती घडून आल्या आहेत.

भारतीय संस्कृतीत स्वप्नांना आध्यात्मिक व तात्त्विक स्थान आहे. संत साहित्यांत स्वप्नांचा उल्लेख अनेकदा येतो. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर यांनी मानवी मनाला अंतर्मुख होऊन आध्यात्मिकतेचे स्वप्न दाखवले. या स्वप्नांमुळे समाजात नैतिक मूल्यांची रुजवात झाली. आधुनिक काळात मात्र स्वप्ने राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेशी जोडली गेली. पं. नेहरूंनी आधुनिक भारताचे औद्योगिक व वैज्ञानिक स्वप्न पाहिले, तर डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी तरुणाईला विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आधारे भारताला 'विकसित राष्ट्र' बनविण्याचे स्वप्न दाखवले. डॉ. कलाम यांचे प्रसिद्ध वचन आहे, 'स्वप्न पहा, स्वप्न पहा, स्वप्न पहा. स्वप्ने विचारांमध्ये रूपांतरित होतात आणि विचार कृतीत रूपांतरित होतात.' ('Dream, dream, dream; dreams transform into thoughts and thoughts result in action.') हे वचन जागतिक स्वप्न दिनाचा खरा आत्मा स्पष्ट करते.

आजच्या काळात जागतिक पातळीवर असंख्य आव्हाने उभी ठाकली आहेत. गरीबी, भूक, बेरोजगारी, युद्ध, दहशतवाद, हवामान बदल, पाणीटंचाई, प्रदूषण, विषमता, महिलांवरील अत्याचार, बालमजुरी इत्यादी समस्यांनी मानवजातीचे अस्तित्वच धोक्यात आणले आहे. या समस्यांवर मात करण्यासाठी केवळ राजकीय धोरणे किंवा आर्थिक योजना पुरेशा नाहीत, तर सामूहिक स्वप्ने आणि त्यांची पूर्तता करण्यासाठी सर्वसमावेशक प्रयत्न आवश्यक आहेत. उदा. संयुक्त राष्ट्रसंघाने जाहीर केलेली शाश्वत विकास उद्दिष्टे ही प्रत्यक्षात मानवजातीची सामूहिक स्वप्ने आहेत. २०३० पर्यंत सर्व प्रकारची गरीबी नष्ट करणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचवणे, लिंगभाव समानता प्रस्थापित करणे, हवामान बदलावर नियंत्रण ठेवणे, पर्यावरणाचा समतोल राखणे ही उद्दिष्टे म्हणजे मानवतेच्या भविष्यासाठीची स्वप्नेच आहेत. जागतिक स्वप्न दिन या स्वप्नांशी प्रत्येक व्यक्तीला जोडतो.

भारतीय संदर्भात तरुणाई ही देशाची सर्वात मोठी ताकद मानली जाते. भारतातील ६५ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या ३५ वर्षांखालील आहे. या तरुणाईच्या स्वप्नांमध्ये भारताचे भविष्य दडलेले आहे. शिक्षण, रोजगार, स्टार्ट-अप्स, विज्ञान-तंत्रज्ञान, कला-संस्कृती, क्रीडा यांसारख्या क्षेत्रांत तरुणांनी मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी झटले तर भारताला जगातील अग्रगण्य राष्ट्र बनविणे अशक्य नाही. मात्र या स्वप्नांना सामाजिक जबाबदारीची जोड देणे अत्यावश्यक आहे. कारण वैयक्तिक स्वप्ने फक्त वैयक्तिक प्रगती घडवतात, पण सामूहिक हिताशी जोडलेली स्वप्ने संपूर्ण समाजाचा कायापालट घडवतात. शिक्षणक्षेत्रात जागतिक स्वप्न दिनाला विशेष महत्त्व आहे. शाळा-महाविद्यालयांत या दिवशी विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातील ध्येये ठरवण्यास प्रवृत्त केले जाते. अनेक ठिकाणी 'स्वप्न भिंत' (Dream Wal) तयार केली जाते, जिथे विद्यार्थी आपली स्वप्ने लिहून लावतात. ही केवळ कागदावरील नोंद नसून त्यांच्या जीवनयात्रेचा प्रारंभबिंदू ठरते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो, त्यांची सर्जनशीलता वाढते आणि त्यांच्या स्वप्नांना वास्तवात आणण्याची ऊर्जा मिळते. जागतिक स्वप्न दिन आपल्याला अंतर्मुख होण्याची संधीही देतो. आपण आयुष्यात काय साध्य करू इच्छितो? आपली खरी ओढ कुठे आहे? आपले स्वप्न केवळ स्वतःपुरते आहे की त्याचा समाजालाही लाभ होईल? हे प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारले पाहिजेत. कारण समाजहिताशी जोडलेले स्वप्नच खरे परिवर्तन घडवते. महात्मा गांधींचे 'सर्वोदयी समाजाचे स्वप्न', डॉ. आंबेडकरांचे 'समानतेवर आधारित लोकशाहीचे स्वप्न', भगतसिंगांचे 'शोषणमुक्त समाजाचे स्वप्न', अब्दुल कलाम यांचे 'विकसित भारताचे स्वप्न' या सर्व स्वप्नांमधूनच भारताने दिशा घेतली आहे.

आज आपण पाहतो की जगभरातील अनेक आंदोलने, चळवळी आणि मोहिमा प्रत्यक्षात एखाद्या सामूहिक स्वप्नावर आधारलेल्याच आहेत. पर्यावरणवादी ग्रेटा थनबर्ग हिने तरुणांच्या मनात ह्यहवामान बदलाविरुद्ध कृती'चे स्वप्न जागवले. मलाला युसुफझाई हिने 'प्रत्येक मुलीला शिक्षणाचा अधिकार' या स्वप्नासाठी संघर्ष केला. नेल्सन मंडेला यांनी 'वर्णभेदमुक्त समाजाचे स्वप्न' सत्यात उतरवले. या सर्व उदाहरणांतून स्पष्ट होते की एखादे स्वप्न कितीही अशक्य वाटले तरी सातत्यपूर्ण प्रयत्न, जिद्द आणि एकजुटीने ते वास्तवात उतरविता येते. जागतिक स्वप्न दिनाचा खरा संदेश असा आहे की आपण आपल्या जीवनात ध्येय निश्चित करावे, मोठी स्वप्ने पाहावी, त्या स्वप्नांसाठी योजनाबद्ध प्रयत्न करावेत आणि त्यांना समाजहिताशी जोडावे. वैयक्तिक यशासोबत सामाजिक जबाबदारीची जाण ठेवणारे स्वप्न हेच भविष्यातील जगासाठी उपयुक्त ठरते. स्वप्न म्हणजे केवळ भास नाही, तर ते जीवनाला अर्थ देणारे वास्तव आहे.

शेवटी एवढेच म्हणता येईल की, स्वप्ने नसतील तर कल्पनाशक्तीही मरते आणि कल्पनाशक्तीशिवाय प्रगती शक्य नाही. स्वप्न म्हणजे आशेचा दिवा, प्रगतीचा मार्गदर्शक आणि परिवर्तनाचे साधन. म्हणूनच दरवर्षी २५ सप्टेंबरला साजरा होणारा ह्यजागतिक स्वप्न दिनह्ण हा केवळ एक औपचारिकता नाही, तर मानवतेच्या सामूहिक आशा-आकांक्षांचा उत्सव आहे. या दिवसाचे औचित्य साधून प्रत्येकाने आपल्या स्वप्नांची उजळणी करावी, त्यांना नवी दिशा द्यावी आणि त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी एकजुटीने पुढे यावे. कारण स्वप्नांतूनच वास्तव घडते आणि वास्तवातूनच नवी दुनिया साकार होते.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com

## प्रबोधन

# मी कोण आहे? आलो मी कोठून?

वेद अनंत बोलिला, अर्थ इतुकाची साधिला ।
विठोबासी शरण जावे। निजनिष्ठा नाम गावे ॥

मग अशी विद्रोही वैचारिक भूमिका घेऊन वेदविद्येनेही पछाडलेल्या जिज्ञासूंना अचूक, संक्षिप्त, साररूप मार्गदर्शन करणाऱ्या जगद्गुरू तुकोबांनी शरीर हेच श्रेष्ठ आहे आत्मा श्रेष्ठ नाही, हे सांगून आपल्या विवेकनिष्ठेचं विस्तृत रूपही दाखवून दिलं आहे. आत्म्याचा अमरपणा सांगताना व्यासांनी इतकी चुकीची माहिती दिली की, भला शहाणा माणूसही चक्रावून जावा. म्हणे आत्मा शस्त्राने तुटत नाही, अग्नीने जळत नाही, पाण्याने भिजत नाही, वाऱ्याने सुकत नाही. तुकोबा व्यासोक्तीला छेद देताना आत्माच नाकारतात. ते म्हणतात, आत्मा नाही आला गेला ।कोठे आहे आत्मा ? - तो येतही नाही आणि जातही नाही. आत्मा नेणोनी ही कोणी ।ऐकूनी तैसे वाखाणी ॥ अर्थात, आत्मा ही सांगोवांगीतून लोकमानसावर जबरदस्तीने लादलेली कल्पना आहे, ती अफवा आहे, पण बुद्धिदात्या गणेशाची सांगोपांग पूजा- अर्चा केल्यानंतरही अनंत चतुर्दशीनंतर येणाऱ्या श्राद्ध पक्षात सुशिक्षित म्हणवणारेही अकलेला तिलांजली देऊन आपल्या पितरांचा आत्मा शांत करताना दिसतात.

संत तुकोबांना आद्य शंकराचार्यांच्या प्रबोध सुधाकर या छोट्या पोथीतील देहनिंदा प्रकरणम्ची विचारसरणी मोडीत काढायची होती. या प्रकरणात शंकराचार्य म्हणतात, 'पायाच्या नखाच्या टोकापासून ते मस्तकावरील केसांपर्यंत हा देह नुसता दुर्गंधीने भरलेला आहे.' स्वतः देह धारण करून आणि त्या देहाकडून स्वतःची तुष्टीपुष्टी साधणाऱ्याने त्या देहाला नावं ठेवावीत, हे अधमपणाचंच आहे. म्हणूनच प्रा. मा. का. देशपांडे म्हणतात, 'नरदेहाचा ओंगळपणा दाखवण्याची फॅशन प्रथम श्रीमत् शंकराचार्यांनी पाडलेली असावी. मानवी शरीराबद्दल जेवढं काही वाईट म्हणता येईल, तेवढं म्हणून ते मोकळे झाले आहेत.' अशा थोर धर्मनेत्याच्या (कु) वचनाचा खरपूस समाचार घेताना संतश्रेष्ठ तुकाबाराय म्हणतात, शरीर उत्तम चांगले। शरीर सुखाचे घोंसुले ।शरीरे साध्य होय केले। शरीरे साधले परब्रह्म ।म्हणूनच आत्म्याला मोक्ष देण्यासाठी आसुसलेले काही म्हणोत, पण शरीर नसेल तर भक्ती कशी करणार? नमस्कार कसा होणार? नामस्मरण कसं होणार? सारांश, शरीराशिवाय जीवनाचा विचार करणं शक्यच नाही. म्हणूनच एका संस्कृत वचनाने शरीराचं श्रेष्ठत्व थोडक्यात सांगितलं आहे. ते असं- शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् । अर्थात, सर्व प्रकारचं धर्म-कर्तव्यं पाळण्यासाठी प्राधान्येकरून पहिलं स्थान शरीरालाच द्यावं लागेल.

स्वामी विवेकानंद म्हणतात, 'आपले मज्जातंतू शक्तिसंपन्न करा, आपल्याला लोखंडी स्नायू व पोलादी मज्जातंतू हवे आहेत. आपल्या पायावर उभे राहा व मनुष्य बना.' अशाप्रकारे स्वामी विवेकानंदांनी सनातनधर्मपालक शंकराचार्यांच्या मनुष्यदेहद्वेषी विचारालाच निकालात काढलं आहे. '

वास्तविक, यावज्जीवेत सुखं जीवेत म्हणणारा आद्य प्रबोधनकार महात्मा चार्वाक तर देह आहे तोपर्यंतच सुख भोगा असं म्हणतो. देहाची मृत्यूनंतर राख झाली की, पुन्हा जन्म नाही, हे त्याचं हजारो वर्षांपूर्वीचं कळकळीचं सांगणं होतं. पण हट्टी सनातनी, चार्वाकवाद्यांची वाट चुकवीत राहिले. त्यासाठी अनेक फसवे तर्क त्यांनी उपस्थित केले. शरीर पंचमहाभुतांचं बनलं आहे, हे त्यांचं म्हणणंच धादांत खोटं आहे. याला वैचारिक घसरगुंडी म्हटली पाहिजे. जर शरीर पंचमहाभूतजन्य आहे, तर ते का मरतं? पिंड आणि ब्रह्मांड ह्या दोन शब्दांत ध्वनीसाम्य आहे. पण पिंडी ते ब्रह्मांडी हे सूत्रही चुकीचं व घसरून पडणारं आहे. ब्रह्मांडाचा शोध मानवी शरीरात शोधण्याचा प्रयत्न एखादा वेडा माणूसच करेल. भ्रमिष्ट सनातनी शहाजोगपणे दिसेल त्याला तू कोण? तू कोठून आलास? कोठे जाणार? असे प्रश्न विचारतात. ह्या प्रश्नांची उत्तरंही सोपी आहेत. उदाहरणार्थ, 'मी अमुक आहे. आई-बापाच्या पोटी जन्मलो आणि मरण आलं की माझं जीवन संपेल! मेलेला माणूस कोठे जाणार? स्मशानात, खड्डयात!' निसर्ग चिरंतन आहे, पण शरीर मात्र नष्ट होणारंच आहे, साध्या गोष्टी हे जुने मताभिमानी हट्टी लोक लक्षात घेत नाहीत. शरीराच्या पंच ज्ञानेंद्रियांत डोळे, नाक, कान, जीभ, त्वचा यांच्याबरोबर मेंदूचा, मनाचा उल्लेख का केला जात नाही?ज्ञानेंद्रियांची पारंपरिक माहिती अजून किती वर्षांनी आद्ययावत होणार?

म्हणून आपण वैज्ञानिक दृष्टी जोपासून त्याप्रमाणे विचार करणं आवश्यक आहे. कोऽहम्, सोऽहम्, अहं ब्रह्मास्मि, तत्त्वंअसि हे सर्व शब्द आणि त्यामागील विचारसरणीचा कोंडाकुटी कार्यक्रम आपल्या देशातील पुराणपंथी दीडशहाण्यांनी खूप केला आणि ह्या कुजक्या- नासक्या- विटक्या विचारांची खरूज परकीयांनाही लावली. पण या विचारांची व्यर्थता आपण जाणली नाही, तर नव्या विचारविश्वाची ओळखच होणार नाही. प्रत्येकाला जन्माला घालण्यामागे नियती (?) नावाचं गौडबंगाल असतं; तिचा काही हेतू (डोंबलाचा!) असतो; ही अजागळ, बावळट, निरर्थक, कुचकामी, डोकेफिरू, अंतहीन आणि तर्कहीन विचारसरणी फेकल्याशिवाय नव्या युगात कोणालाही जाता येणार नाही.

आपल्या पूर्वजांचं स्मरण जरूर करावं, पण ते पिंडात वा कावळ्यात पितरांचा आत्मा पाहून नव्हे! अशा थोतांडी श्राद्धांना मूठमाती दिल्यानंतरच नव्या युगाचा आनंद घेता येईल. मग समजेल-

मी कोण आहे?। आलो मी कोठून?
फालतू हे प्रश्न ।अडाण्याचे ॥१
माणूस असता ।मी कोण? म्हणणे
वेड पांघरणे ।ठीक नव्हे ॥२
आहे ते सांभाळा ।पैसा-कुटुंब अपुले
जीवन कोठले ।त्यांच्याविना ॥ ३
शरीर सुदृढ ।ठेवावे निरोगी
आत्म्यासाठी रोगी ।नका होऊ ॥४
नको उपवास ।शिक्षा शरीराला
अकाली मृत्यूला ।मिठी का हो ॥५
जगा आधी नीट ।कशाला सांगता
पुनर्जन्म कथा ।भेटे त्याला ॥ ६
शरीरासवेच ।मरतसे आत्मा
नका संशयात्मा ।उगा होऊ ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# जीवनाच्या शाळेत मात्र आम्ही उच्चशिक्षितच !




आज उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम अंतर्गत नवसाक्षरांची परीक्षा घेण्यात आली. खरंतर शिकण्याला वय नसते असाच आजचा अनुभव!

मध्येच शाळा सोडलेले, कधीही शाळेत न गेलेले व्यक्ती यांची अक्षर ओळख राहूनच गेली.त्यांना आधी निरक्षर आणि आता असाक्षर म्हणून ओळखले जात आहे. आज ते अक्षराचे जरी असाक्षर असले तरी आयुष्याच्या शाळेत मात्र हे सर्वजण उच्चशिक्षित आहेत.

आज आमच्यापुढे बसलेले बहुतांश पन्नाशी साठी नंतरचे आणि जवळपास ८०-९० वर्षापर्यंत वय असलेले व्यक्ती होते.काहींच्या हाताला सुरकुत्या पडलेल्या, केस पिकलेले, काहींच्या डोळ्यावर भिंगाचे चष्मे, काहीजण काठी घेऊन चालत होते तर काहीजण विचारमग्न होते. स्त्रिया छान नऊवारी लुगडं घालून अंगभर पदर घेऊन आल्या होत्या. आणि आजोबा/काका डोक्यावर पांढरी टोपी, धोतर, सदरा घालून आले होते.

एक आजी म्हणाली,

"गुरजी जरा लवकर आटपा बरं आम्हांल जायाचं हाय."

"आजी आता कुठं जाता?" मी म्हटलं.

आजी म्हणाल्या, "गुरजी आम्हालं निंदायला जायचं हाये. बाया पुढ गेल्या आमच्या."

मी पुन्हा म्हणालो, "बाप्पा एवढं हित!! म्हातारपणी एवढं हित कशाला करता?"

यानंतरच्या वाक्याने मला माज्या करत असलेल्या कामाला सुद्धा बळ मिळाले.

आजी म्हणाली," बापा गुरजी कामानं माणूस काय मरते का ?होतंय तव्हरक करावं."

वरील वाक्य प्रचंड प्रेरणादायी होतं.हातापायात पाहिजे तसा जोर नाही, डोळ्याने नीट दिसत नाही परंतु मनात प्रचंड ऊर्जा घेऊन ही पिढी जगत आहे. या पिढीला ना कधी सध्याच्या लोकांसारखं फ्रस्ट्रेशन आलं ना कधी स्ट्रेस आला! कारण यांची स्वतःच्या मनगटावर, कर्मावर आणि ईश्वरावर सुद्धा प्रचंड श्रद्धा आहे. सोबतच आयुष्याकडून मोजक्या अपेक्षा, कुणाचाही द्वेष मत्सर न करणे, कुणावर न जळणे आणि आपलेपण जपणे अशा अनेक गोष्टी असल्याने कधी ताण आला नाही. हीच लोकं पिढी, संस्कृती आणि गावपण जपणारी आहेत.

या पिढीने असंख्य आव्हाने पेलून जीवन जगले. संसारातील प्रचंड अडचणीला तोंड देऊन लेकरांचे लाड, शिक्षण, आजारपण असे कर्तव्य केले. यांचे केस पिकले ते त्यांच्या केलेल्या संघषार्ने,अनुभवाने आणि त्यागाने.या पिढीने अनेक सुख आणि मौजेचा त्याग करून आपल्या लेकराबाळाला सांभाळून त्यांना घडवलं आणि मढवलं! कधी एक वेळ न जेवता तर कधी उपाशी राहून, लाल ज्वारी, लाल गहू खाऊन पोटं भरली पण आपली संस्कृती आणि संसार टिकवून ठेवले.आजही या स्त्रिया म्हातारपण आलेलं असूनही त्यांच्या नजरेत एक प्रकारचे उच्च दर्जाचे लाजणे आहे. गुरजी म्हटला की त्यांच्या नजरा आपोआप लाजतात किंवा आदराने झुकतात. आजही या पिढीने अक्षराचे शिक्षण घेतले नसले तरी गुरजी (गुरुजी) बद्दल आदर आणि आस्था कमालीची आहे.

आज असं वाटत होतं की परीक्षा लवकर संपूच नये. कारण काही आज्या आणि काकू छान त्यांच्या वेळेच्या छान छान गोष्टी सांगत होत्या.

एक आजी म्हणाली,

" गुरजी माही ही नात मला लै जीव लावते बरं."


मी म्हटलं, "आजी, आम्ही मुलांना नेहमी सांगतो की, आपल्या आजी आजोबांसोबत दहा मिनिट गप्पा मारत जा."

आजी म्हणाली, "मही नात खूप गप्पा मारते मह्यासंग." आजीचं हे वाक्य ऐकून खूप बरं वाटलं.

एक आजी तर चक्क व्हरांड्याच्या खाली चप्पल काढून ठेवली.

आजी म्हणाली, "नाही बापा वर नेली तर तुम्ही बोलसाल." एवढा आदर म्हणा किंवा त्यांच्या बालवयातील शाळेचा धाक आजही त्यांच्या मनात जाणवला. म्हणून असं वाटते की आनंददायी शिक्षण किती आवश्यक होतं.

या पिढीतील अक्षराने असाक्षर परंतु जीवनाच्या शाळेत प्रचंड हुशार आणि अनुभवी व्यक्तींना भेटून खरंच एक प्रकारचे बळ मिळाले. परिस्थिती कशीही असो जगणं आणि लढणं सोडायचं नाही ही शिकवण आज या निमित्ताने मिळाली.



**रविंद्र बालाजी देबडवार**
जि.प.प्राथ.शाळा,
खंदारेवस्ती (मोडनिंब)
ता.माढा जि.सोलापूर

पान १ वरून

# पूरग्रस्त शेतकऱ्याने थेट...

### परिसरात तणावाचे वातावरण

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे माढा तालुक्यातील निमगाव आणि दारफळ या पूरग्रस्त गावांची पाहणी करून परत जात असताना ही घटना घडली. सीना नदीला आलेल्या महापुरामुळे या भागात शेकडो हेक्टर शेतजमीन पाण्याखाली गेली आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. आपली व्यथा आणि नुकसान झालेले पाहून निराश झालेल्या एका शेतकऱ्याने मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधण्यासाठी अचानक त्यांची गाडी अडवली. हा शेतकरी धावत मुख्यमंत्र्यांच्या गाडीजवळ गेला. यानंतर त्याने हातवारे करत मुख्यमंत्र्यांपुढे व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला. मात्र तिथे असलेले सुरक्षारक्षक त्याला बाजूला केले आणि नंतर मुख्यमंत्र्यांची गाडी पुढे गेली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

मुख्यमंत्री पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर गेल्यानंतर काही शेतकऱ्यांनी त्यांच्यासमोर व्यथा मांडल्या. यावेळी शेतकऱ्याने व्यक्त केलेल्या भावना समजून घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याला धीर दिला. शासन या सर्व बाधित लोकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच, तातडीची मदत दिली जाईल. तसेच झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याचा पुरेपूर प्रयत्न केला जाईल, असेही देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

### पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदतीची अपेक्षा

दरम्यान बीड जिल्ह्यातील सिंदफना नदीला आलेल्या पुरामुळे नाथापूर गावातील शेकडो हेक्टर ऊस, सोयाबीन आणि कापसाचे पीकही पाण्याखाली गेले आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदतीची अपेक्षा आहे. त्यामुळे, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी तातडीने लक्ष घालून पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत. माढ्यात घडलेली घटना ही या संतापामुळेच घडली असावी, असे बोललं जात आहे. आता सरकार शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता कशी करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतमालाची पालकमंत्र्यांकडून पाहणी

**चंद्रपूर, (कटूसत्य वृत्त)ः-** अतिवृष्टीमुळे झालेल्या चिमूर आणि वरोरा तालुक्यातील शेतमालाची जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी आज बांधावर जाऊन पाहणी केली व शेतकऱ्यांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांच्यासोबत राज्याचे कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल होते. चिमूर तालुक्यातील भिसी येथे प्रकाश खाटीक व विलास खाटीक यांच्या शेतातील नुकसानग्रस्त सोयाबीनची पाहणी, वाहनगाव येथील बालाजी जुगनाके, बोथली येथील नितीन खापणे, खामगाव येथील शालू रामटेके तसेच वरोरा तालुक्यातील चारगाव (बु.) येथील प्रफुल्ल सोनकर, भेंडाळा येथील संजय उरकुडे या शेतकऱ्यांच्या शेतात जावून बाधित शेतमालाची पाहणी केली.

पालकमंत्री डॉ. वुईके म्हणाले, आज या परिसरात नुकसानग्रस्त शेतमालाची पाहणी करताना जाणवले की, अतिवृष्टीमुळे सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भरपाई मिळवून देण्यासाठी आपला प्रयत्न राहील. पंचनाम्याचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तात्काळ शासनास पाठवला जाईल. पिडीत शेतक-यांना जास्तीत जास्त अनुदान कसे मिळवून देता येईल, यासाठी निश्चितच प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले, विदर्भात मोठ्या प्रमाणात सोयाबीनचे नुकसान झाले आहे. सोयाबीनचे दाणे अतिशय छोटे असून काही भागात कटाईला सुद्धा परवडणार नाही, अशी सोयाबीनची परिस्थिती आहे. गत महिन्याच्या भरपाईचा निर्णय शासनस्तरावर झाला आहे. सप्टेंबर महिन्याच्या पंचनाम्याची प्रक्रिया सुरू आहे. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असून नुकसानीचा सर्व अहवाल शासन स्तरावर पाठविण्यात येणार आहे, असे ते म्हणाले.

चिमूर तालुक्यात पाहणी दरम्यान आमदार कीर्तीकुमार भांगडिया, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. संतोष थीटे, उपविभागीय अधिकारी किशोर घाडगे, तहसीलदार श्रीधर राजमाने, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार आदी उपस्थित होते. तर वरोरा तालुक्यातील गावांच्या पाहणी दरम्यान खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार करण देवतळे, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, उपविभागीय अधिकारी अतुल जटाळे, तहसीलदार योगेश कौटकर यांच्यासह सर्व अधिकारी उपस्थित होते.

## वात्रटिका

### व्वा रे पाक सैनिक

ऐकून होतो की काही जण
आपणच आपली बडवतात...
पण पहायला मिळाले आता
आपणच आपली उडवतात....
आपल्याच सैनिकांचा आपल्याच
लोकांवर केला हवाई हल्ला...
औकात सोडून वागणे आणि
नको त्याचा ऐकतो सल्ला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# चौडेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन लक्ष्मीकांत उदगिरी तर व्हाईस चेअरमन विलास बडगंची

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर येथील सहकार क्षेत्रातील सहकारनिष्ठ पुरस्कार मिळवलेल्या जोडभावी पेठ येथील श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतसंस्थेच्या 2025 – 26 वर्षाकरिता चेअरमन म्हणून लक्ष्मीकांत रामचंद्र उदगिरी यांची तर व्हाईस चेअरमन साठी विलास विश्वनाथ बडगंची यांची एकमताने निवड करण्यात आली.



लक्ष्मीकांत रामचंद्र उदगिरी



विलास विश्वनाथ बडगंची

श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची सभा प्राधिकृत अधिकारी एस एस मलवे (सहकारी अधिकारी श्रेणी – 2) यांच्या नियंत्रणाखाली पार पडली. यावेळी संचालक मंडळाच्या सभेत वरील निवड एकमताने करून नूतन चेअरमन लक्ष्मीकांत रामचंद्र उदगिरी व व्हाईस चेअरमन विलास विश्वनाथ बडगंची यांचा सत्कार अधिकारी एस एस मलवे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय समाजाचे अध्यक्ष नागनाथ कोंतम, संचालक अरुण चिंता, विठ्ठल बडगंची, अरविंद पुडूर, नरेंद्र बत्तुल, मल्लिकार्जुन खंडे, विष्णू म्याकल, शंकर कोंतम, अजय रंगम, चंद्रकांत रंगम, उमा पुडूर, अंबिका उदगिरी, विजयकुमार शिंपी, रूपसिंग राठोड, भगवंत फलमारे, ॲड. अंबादास कंदीकोंडा आदी उपस्थित होते.

श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतसंस्था हे सोलापूर जिल्ह्यातील अग्रगण्य संस्था असून या संस्थेत एकूण ठेवी 255 कोटी असून कर्ज 215 कोटी दिलेले आहेत संस्थेचा एकूण व्यवसाय 470 कोटी पर्यंत पोहोचलेला असून यंदाच्या वर्षीचा निव्वळ नफा पाच कोटी 25 लाख इतका झालेला आहे.

संस्थेची स्थापना 1988 ला झालेली असून तिला आज 38 वर्षे पूर्ण होत आहेत. एकूण आठ शाखांमधून काम पाहत असून संस्थेची गुंतवणूक क्षमता फार मोठी झालेली असून ती जवळजवळ 70 कोटी 31 लाख पर्यंत गेलेली आहे संस्थेचा एनपीए प्रमाण अगदी 0% टक्के असून ऑडिट वर्ग स्थापनेपासून सतत "अ" राहिलेला आहे.

संस्थेला आज तागायत एकूण 20 पुरस्कार मिळालेले आहेत. यात प्रामुख्याने उल्लेख करावा असा सहकारनिष्ठ पुरस्कार मिळालेला आहे ही गोष्ट अभिमानास्पद आहे.

# नवरात्र महोत्सव निमित्त श्री विठ्ठल व माता रुक्मिणीचे राजस लोभस रूप पाहण्यास भाविकांची गर्दी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे तिस–या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस श्री. तुळजाभवानी पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आला असल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

रूक्मिणी मातेस मण्यां मोत्याच्या पाटल्या,सोन्या मोत्याचे तानवड जोड, सूर्य, मोठी नथ, कर्णफुले जोड, पुतळ्यांची माळ, पैंजण जोड, रूळ जोड, मस्त्य जोड, मोत्याचा तुरा, मोत्याचे मंगळसूत्र, पेठ्याची बिंदी, सरी लहान, खड्याची वेणी, चिंचपेटी हिरवी, ठुशी, जडावाचा हार, नवरत्नाचा हार, मोत्याचा कंठा इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच श्री विठ्ठलास सोन्याचे मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेठ्या जोड, हिऱ्याचे कंगण जोड, शिरपेच १० लोलक असलेला, तोडे जोड, एकदाणी, हायकोल, शाळीग्राम हार, जवेची माल २ पदरी, पैंजण जोड, बोरमाळ मोठी ३ पदरी, मोत्याचा तुरा इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच राधिका मातेस सिद्धेस्वर टोप, जवमनी पदक, चिंचपेटी तांबडी, जवेची माळ, पुतळ्यांची माळ व सत्यभामादेवीला नक्षी टोप, हायकोल जवेची माल, मोहराची माळ, लक्ष्मीहार इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.



तसेच मंदिर समितीच्या अखत्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई–तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आला आहे. श्रीस परिधान करण्यात येणारे अलंकार अत्युत्कृष्ट व असामान्य कलाकुसरीचे तसेच पुरातन व दुर्मिळ आहेत. या अलंकाराचे 'मकर कुंडले तळपती श्रवणी। कंठी कौस्तुभमणी विराजित।' यांसारख्या अनेक अभंगांतून संतांनी वर्णन केलेले आहे.

नवरात्र महोत्सवानिमित्त श्री विठ्ठलास नऊ दिवस पोषाखावेळी अलंकार व रूक्मिणीमातेस विविध प्रकारचे पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात येत असल्याने, भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आणि सन्मानिय सदस्य यांचे मार्गदर्शनाखाली नवरात्र उत्सवातील सर्व प्रथा व परंपरांचे कटाक्षपणे पालन करण्यात येत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

# सिटूच्या पुढाकारातून ५०२ कामगारांना संसारोपयोगी साहित्य संचाचे वाटप



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून पात्र नोंदणीकृत कामगारांना लाभ देण्यात येतात. या मंडळासाठी राज्यातील बांधकामांवर आकारल्या जाणाऱ्या १ टक्का सेसद्वारे हजारो कोटींचा निधी जमा होतो. या निधीचा विनियोग फक्त कामगारांच्या कल्याणासाठीच व्हायला हवा, असे मत ज्येष्ठ कामगार नेते व माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी व्यक्त केले. दिवाळीसारख्या राष्ट्रीय सणानिमित्त बांधकाम कामगारांना २५ हजार रुपयांचा बोनस द्यावा, अशी मागणी त्यांनी राज्य शासनाकडे केली.

मंगळवार, दि. २३ सप्टेंबर रोजी लाल बावटा बांधकाम कामगार युनियन (सिटू) तर्फे ५०२ बांधकाम कामगारांना संसारोपयोगी साहित्य संच वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सिटूच्या नेत्या व माजी नगरसेविका कॉ. नलिनीताई कलबुर्गी यांनी भूषविले. यावेळी लोकप्रिय नगरसेविका कॉ. कामिनीताई आडम, माकपचे कॉ. युसुफ शेख (मेजर), कॉ. शंकर म्हेत्रे, प्रा. अब्राहम कुमार, कॉ. अमित मंचले आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना कॉ. आडम मास्तर म्हणाले – 'स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात कामगारांनी रक्तरंजित संघर्ष करून कायदे अस्तित्वात आणले. मात्र २०१४ नंतर मोदी सरकारने ४४ कामगार कायदे चार श्रमसंहितेत गुंफून कामगारांच्या हक्कांवर गदा आणली आहे. कारखानदार व कॉर्पोरेट कंपन्या कामगारांचे शोषण करत असून सरकार त्यांना पाठबळ देत आहे. याला उत्तर म्हणून ९ जुलै २०२५ रोजी देशभरातील २५ कोटी कामगारांनी सार्वत्रिक संप करून कामगारविरोधी धोरणांचा निषेध केला.'

ते पुढे म्हणाले की, बांधकाम क्षेत्र अत्यंत धोकादायक असून सामाजिक सुरक्षा हमखास मिळायला हवी. मुंबईत २००८ मध्ये घडलेल्या कामगाराच्या अपघातानंतर त्यांनी या प्रश्नाची दखल घेऊन विधानसभेत बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ स्थापनेचा प्रस्ताव मांडला होता. अखेर २०१० मध्ये मंडळ अस्तित्वात आले.

यावेळी त्यांनी आरोग्य सुविधेत वाढ करून मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये मोफत उपचार, किमान १० हजार रुपयांचे निवृत्ती वेतन, तसेच नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्याची गरज असल्याचे अधोरेखित केले.

मुसळधार पावसातही हजारो बांधकाम कामगारांनी एकाही क्षणासाठी जागा न सोडता कार्यक्रमात हजेरी लावली.

मार्गदर्शन करताना माकपचे जिल्हा सचिव कॉ. युसुफ मेजर शेख यांनी 'कामगार योजनांमध्ये सुरू असलेली दलाली तातडीने थांबली पाहिजे. खरे लाभार्थी वंचित राहू नयेत यासाठी बांधकाम कामगारांची एकजूट हीच काळाची गरज आहे,' असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाला माजी नगरसेवक मा. अयाज शेख, लोकप्रधान न्यूज चॅनलचे संपादक मारेप्पा फांदिलोलू, ॲड. अनिल वासम, कॉ. श्रीनिवास म्हेत्रे, संजू बॉस जंगडेकर, मार्तंड अण्णा शिंगारे, मोनेश घंटे, आनंद तीपलदिनी आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक कॉ. मारेप्पा फांदिलोलू यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ॲड. अनिल वासम यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशासाठी अजय भंडारे, सिमोन पोगुल, गौतम जगले, विकास कमलापुरे, रवि भंडारे, टायसन जगले, प्रमोद कुरकल्ली, सुरेश फरड, सुनील काडे, इमॅन्युएल सातालोलू, सनी भंडारे, विजयकुमार भंडारे, टोनी जगले, जेम्स तीपलदिनी, पिंटू भंडारी, सिद्राम साखरे, अक्षय भंडारे, महेश भंडारे, छोटू म्हेत्रे, आकाश शिंगारे, विल्सन जगले आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# गरजू विद्यार्थिनींना सायकल वाटप व २१०० विद्यार्थ्यांना स्नेहभोजन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** उद्योग महर्षी उदयसिंह शंकरराव मोहिते पाटील (बापूसाहेब) यांच्या ६५व्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. श्री क्षेत्र आनंदी गणेश आनंदनगर येथील शक्तीस्थळावर समाधीस अभिवादन करून विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या प्रसंगी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, मदनसिंह मोहिते पाटील, डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते पाटील, अर्जुनसिंह मोहिते पाटील, शिवतेजसिंह मोहिते पाटील, ईश्वरीदेवी मोहिते पाटील, देवन्या मोहिते पाटील, स्वरूपाराणी मोहिते पाटील, विश्वतेजसिंह मोहिते पाटील, शिवांशिका मोहिते पाटील, इशिता मोहिते पाटील, जयवर्धनसिंह मोहिते पाटील, यांच्यासह विविध संस्था पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

श्री क्षेत्र आनंदी गणेश सेवाभावी संस्था, आनंदनगर–अकलूज यांच्या वतीने परिसरातील गरजू विद्यार्थिनींना सायकल वाटपाचा कार्यक्रम मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न झाला. तसेच श्री क्षेत्र आनंदी गणेश मंदिर येथे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते ग्रामीण तीर्थक्षेत्र योजनेअंतर्गत मंजूर विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.

याशिवाय अकलूज येथील अकालई विद्यालयात प्रतिमापूजन करून बापूसाहेबांना अभिवादन करण्यात आले. यावेळी उदयसिंह क्रीडा मंडळाच्या वतीने अकलूज माळेवाडी परिसरातील जिल्हा परिषद शाळांच्या सुमारे २१०० विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात आले.

या कार्यक्रमास शिवशंकर बझार च्या चेअरमन डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील, शिवतेजसिंह मोहिते पाटील, सौ. ईश्वरीदेवी किर्तीध्वजसिंह मोहिते पाटील, सौ. देवन्या शिवतेजसिंह मोहिते पाटील, चि.जयवर्धनसिंह शिवतेजसिंह मोहिते पाटील, तसेच शिक्षक, विद्यार्थी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अक्कलकोटला मुसळधार पावसाची बॅटिंग'; चार ठिकाणचे रस्ते बंद



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यात रविवारी रात्री ते सोमवारी पहाटेच्या दरम्यान पडलेल्या पावसामुळे तसेच धाराशिव जिल्ह्यातील पावसामुळे बोरी नदीत पाणी वाढले. अक्कलकोट तालुक्यात पुन्हा पुरस्थिती निर्माण झाली असून चार ठिकाणचे रस्ते वाहतुकीसाठी बंद झाले आहेत.

तसेच हन्नूर भागातील पितापूर गावाच्या पुलावरून पाणी वाहत आहे. कुरनूर धरणातून पुन्हा २२०० क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात आले असून बोरी नदीकाठच्या नागरिक व शेतकऱ्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

अक्कलकोट शहरात काल सायंकाळी साडेपाच वाजल्यापासून सात वाजेपर्यंत सुमारे दीड तास मुसळधार पाऊस पडत होता. तसेच शहर व तालुक्यात रात्रभर मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने अनेक शेतात पाणी साठले आहे. पंधरा दिवसापासून सतत पाऊस सुरू आहे. नदी, नाले, ओढे, तलाव भरल्याने आता पडत असलेल्या पावसाचे पाणी थेट नदीला व तलावाला जाऊन मिळत असल्याने नदीचा व तलावांचा जलस्तर वाढत आहे. त्यामुळे अनेक भागात बिकट परिस्थिती निर्माण होत आहे.

सोमवारी पहाटे शावळ गावाजवळील ओढ्यावर पाणी आल्याने शावळ ते घुंगरेगाव रस्ता बंद झाला. तसेच वागदरी भागातील शिरशी येथील पुलावरून पुन्हा पाणी जात असल्याने अक्कलकोट ते वागदरी रस्ता पुन्हा बंद झाला. जेऊर येथील गावाजवळ पाणी आल्याने जेऊर ते जेऊरवाडी रस्ता बंद झाला. तसेच बोरी नदीत पाणी वाढल्याने हनुमान भागातील पितापूर या गावातील पुलावरून पाणी वाहत आहे. तसेच दर्शनाळ येथे हरणा नदीला पूर आल्यामुळे दर्शनाळ–आरळी–मुस्ती या गावाशी संपर्क तुटला आहे. भीमा नदीतसुद्धा उजनी धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आल्याने अक्कलकोट तालुक्यातील वाहणाऱ्या भीमा नदी पात्राच्या बाजूकडील गावात व शेतकऱ्यांना सतर्क राहण्याची सूचना देण्यात आली आहे.

**दक्ष राहा; शेतकऱ्यांना सूचना**

सीना नदी पात्रातसुद्धा मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात आल्याने अक्कलकोट तालुक्यातील दक्षिण भागातील कोसेगाव, कलकर्जाळ या गावासह सीना नदीकाठच्या गावातील ग्रामस्थांना व शेतकऱ्यांना दक्ष राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सध्या कोरसेगाव बंधाऱ्यावर दोन फूट पाणी असून वाढलेल्या पाण्यामुळे बंधाऱ्यावर आणखी पाणी वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

# 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धे'चा निकाल जाहीर

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** महागणेशोत्सव महाराष्ट्राचा राज्य उत्सवअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या, 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५' चा निकाल जाहीर झाला असून सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा येथील 'तिरंगा गणेशोत्सव मंडळ'ने राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. तर लातूर येथील 'वसुंधरा वृक्षारोपी गणेशोत्सव मंडळ'ने द्वितीय, अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील 'सुवर्णयोग तरुण मंडळ'ने तृतीय क्रमांक मिळविला आहे.

यासोबतच जिल्हास्तरीय प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्यांची घोषणा करण्यात आली असून तालुकास्तरापर्यंत विस्तारित केलेल्या या स्पधेअंर्तगत विजेत्या तालुकास्तरीय मंडळांची घोषणा करण्यात आली आहे.

राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार, २५ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे आयोजित करण्यात आला असून या समारंभात सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते विजेत्या मंडळांचा पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे. सर्व विजेत्यांचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. शेलार यांनी अभिनंदन केले आहे.

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

**हरवले आहे**


श्री गणपत महाराज अलिबागकर मठ, पंढरपुर ता. पंढरपूर, जि. सोलापूर. नोंदणी क्र. ए/ २०८/सोलापूर. या संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र गहाळ झालेला आहे. तरी तमाम लोकांना विनंती की वरील संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र कोणास आढळून आल्यास खालील दिलेल्या पत्यावर व मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

**विश्वस्त - श्री. गणपत महाराज अलिबागकर मठ, पंढरपूर. श्री नारायण गोपाळ वाजे**

**पत्ता :** घर नं. ३२७७ सद्गुरू गणपतबाबा अलिबागकर महाराज मठ, कासार घाट, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

मो.: ९२२६३९८८४९ / ९८९०७९३०८२

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नाना पाटेकर, अनिल कपूर, अक्षय कुमार यांचा एक विनोदी चित्रपट, स्वागत (इंग्रजीत) २) पोवाडे गाणारा ३) उलटी, वमन ४) बारा गुणिले पाच ५) याचे कणिस भाजून खातात ६) क्रिकेटमधील सिक्सर (मराठीत) ९) दहा गुणिले सात ११) चौघड्याच्या जोडीचे वाद्य १२) तोपर्यंत (ग्रामीण भाषेत) १४) सर्वत्र पसरलेला सुगंध १५) पुरूषांचा नेसावयाचा पंचा २१) श्वास घेण्याची क्रिया २३) छोटा दिवा २४) कपाची जोडीदारीण २६) पटकन, त्वरेने एक फुलझाड २९) झी मराठी वरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या ३०) विदूषक ३३) विषमच्या विरूध्दार्थी ३५) पाच आणि दोन मिळून होणारी संख्या ३७) छोटा, बारीक ३९) पतीची आई ४०) एक अभिनेता-**** खान ४१) इराकची राजधानी ४३) कापड फाटताना होणारा आवाज ४४) फर्निचरसाठी या वृक्षाचे लाकूड वापरतात ४५) मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेता-*** भावे ४७) बोल्टचा जोडीदार, टन उलट लिहा ४९) पैसा, संपत्ती ५१) कविता बनविणारा

**आडवे शब्द :** १) हवामानाचा अंदाज वर्तविणारे कार्यालय ३) भारताचे दक्षिणेकडील एक राज्य ५) एक भारतीय फलंदाज-*** पांडे ७) मांजरामधील नर जात ८) अन्नाचा कण श्वासनलिकेत गेल्यास लागतो *** १०) व्यायाम, मेहनत १३) रांग, माळ १५) खतरा १६) माईंड (मराठीत), चित्त १७) जंगल, अरण्य १८) आई (इंग्रजीत) १९) जरचा साथीदार २०) देव २२) एक मराठी महिना २३) परंतु, पक्ष्याचे पंख (हिंदीत) २५) कोकणातील एक पर्यटनाचे स्थळ २७) उन्हाळ्यातील एक महिना २८) मराठी चित्रपट सृष्टीतील एक ज्येष्ठ अभिनेते ३१) वट उलट लिहा ३२) पंधरा दुणे ३४) रानटी बैल ३६) उद्या (हिंदीत) ३८) शरीरावरील मोठा तीळ ४०) लिंबू पाण्याचे पेय ४२) विहिरीतून पाणी खेचण्याचे पूर्वीचे चक्राकार साधन ४४) वर्ष (हिंदीत) ४६) मादीच्या विरूध्दार्थी ४७) नव्वदच्या दशकातील हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेत्री ४८) समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ५०) कडक, न दबणारे ५२) नऊ गुणिले दहा ५३) मेंढीपालन करणारा एक वर्ग

## सुडोकु - 63

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | 4 | 9 | | | 1 | |
| 7 | 4 | | | 1 | 8 | | | |
| 1 | 9 | 6 | 7 | | | | 2 | 4 |
| | | | 5 | | 1 | 7 | 6 | 2 |
| | | 3 | | 2 | 7 | | 5 | 9 |
| | | | | 4 | | 3 | | |
| | 7 | 8 | 9 | | | | | |
| 4 | 2 | 9 | | | | | 7 | 3 |
| | | | 3 | 7 | | | 9 | 8 |

# शक्ती देवीच्या जयजयकारात प्राणप्रतिष्ठा उत्सव जल्लोषात पार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी यांच्या शारदीय नवरात्र महोत्सवास सोमवारी मोठ्या जल्लोष मय वातावरणात आई राजा उदे उदे सदानंदीचा उदे उदेचा गजर करीत भक्ती आणि शक्ती देवीचा जागर करीत शहरातील विविध मंडळांनी शक्ती देवीची प्राणप्रतिष्ठापना मिरवणूक काढून देवीची प्रतिष्ठापना केली. दरम्यान ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाच्या उत्सव मूर्तीची प्रतिष्ठापना मिरवणूक मंडळाचे संस्थापक आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी सोलापूर रेल्वे स्टेशन समोरील महात्मा गांधी पुतळ्यापासून प्रारंभ करण्यात आला या मिरवणुकीचे शुभारंभ सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे, सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, भाजपा शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल,शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, भाजपाचे ज्येष्ठ नेते विक्रम देशमुख, राष्ट्रवादीचे नेते आनंद चंदनशिवे, उद्योजक सिद्धेश्वर मुनाळे, शिवसेना शहराध्यक्ष सचिन चव्हाण, मनोज शेजवाल, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, आनंद मुस्तारे, अश्विनी हॉस्पिटलचे डॉ. सुजित जागीरदार, गंगामाई हॉस्पिटलचे डॉ. एस प्रभाकर, ऑक्सीजन चेस्ट क्लिनिकचे डॉ. फिरोज सय्यद, डायबेटिक केअर सेंटरचे डॉ. भास्कर पाटील, सलगर वस्ती पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिंदे साहेब, शिवाजी गायकवाड, अंबादास गायकवाड जाधव, ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाचे मार्गदर्शक अनिल जाधव, राजू याराना, चंद्रकांत ब्रदर जाधव, राष्ट्रवादी युवती अध्यक्ष किरण माशाळकर, राष्ट्रवादी महिला शहराध्यक्ष संगीता जोगदनकर, इरफान शेख, माजी नगरसेवक श्रीनिवास कोंडी, रुक्मिणी जाधव, बिराजदार मावशी, संगीता गायकवाड, कैकाडी समाज अध्यक्ष मदन गायकवाड, प्रमिला स्वामी, यांच्यासह विविध राजकीय सामाजिक वैद्यकीय शैक्षणिक अशा अन्य क्षेत्रातील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत शक्ती देवी प्राणप्रतिष्ठापना मिरवणुकीचे विधिवत पूजन होऊन मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. ढोल, ताशा, संभळ आणि हलग्यांच्या कडकडाटात फटाक्यांची आतषबाजी करत हजारो युवकांनी यावेळी शक्ती देवी प्राणप्रतिष्ठापना मिरवणुकी दरम्यान बहारदार लेझीमचा खेळ सादर केला. याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे यांनी देखील ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सवाच्या लेझीम पथकामध्ये सहभागी होऊन लेझीमचा खेळ सादर केला. यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाचे मार्गदर्शक किसन जाधव आणि कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड आणि उत्सव अध्यक्ष चेतन नागेश गायकवाड यांनी केले. नवरात्र उत्सव हा सण वाईटांवर चांगल्यांच्या विजयाचे प्रतीक आहे पौराणिक कथेनुसार देवीचे महिषासुर राक्षसाचा वध करून नकारात्मक शक्तीचा नाश केला त्यामुळे हा उत्सव दैवी स्त्रीत्वाचा आदर सन्मान करण्यासाठी साजरा करण्यात येतो असे मनोगत यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांनी व्यक्त केले तसेच शारदीय नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने तमाम शहरवासी यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना पालिका आयुक्त डॉ.सचिन ओंबासे म्हणाले की शारदीय नवरात्र महोत्सवात सर्व मंडळांनी शासनाच्या नियमांचे पालन करीत नवरात्रोत्सव अत्यंत शांततेने व उत्साही वातावरणाने साजरा करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी बोलताना मंडळाचे मार्गदर्शक किसन जाधव म्हणाले की यंदाच्या वर्षी सोलापूर शहरांमध्ये डीजे मुक्त मिरवणुका काढण्यात येत आहेत प्रशासनाच्या आव्हानाला प्रतिसाद देत आम्ही देखील डीजे डॉल्बीला फाटा देत पारंपारिक वाद्याला प्राधान्य देऊन महाराष्ट्राची संस्कृती जपली आहे शक्ती देवीचा जागर मोठ्या उत्साही वातावरणात मंडळाच्या वतीनं नऊ दिवसात करण्यात येतो यंदाच्या वर्षी देखील कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह असल्याचे ते म्हणाले. यावेळी हजारो कार्यकर्त्यांनी बहारदार लेझीमचा अत्यंत शिस्तबद्ध बहारदार लेझीमचा खेळ सादर केला.

ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाच्या शक्ती देवीची मिरवणूक सोलापूर रेल्वे स्टेशन येथून प्रारंभ होऊन कुमार चौक, मोदी पोलीस चौकी, मोदी रेल्वे ब्रिज, इराणा वस्ती, रामवाडी दवाखाना, पटवर्धन चाळ, एसलबी रिक्षा स्टॉप, काका बिअर शॉप, मरगु मास्तर मैदान सेटलमेंट ग्राउंड, या मार्गावरून निघून ईच्छा भगवंताची चौक येथे प्रतिष्ठापना मिरवणुकीचे विसर्जन करण्यात आले यावेळी धार्मिक विधिवत पूजा होऊन आदिमायेचा जागर करीत शक्ती देवीची प्राणप्रतिष्ठापना उत्साही वातावरणात पार पडला. यावेळी ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच देवी भक्तांची मोठी उपस्थिती होती.

# पावसाचा फळबागांना तडाखा; लाखो रुपयांचे नुकसान



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** सततधार पावसाने फळपिकांची मोठी हानी झाली असून लाखो रुपये खर्च होऊन ही शेतकऱ्याच्या पदरी निराशाच आली आहे.माढा तालुक्यातील अकोले-खुर्द येथे ही कोट्यवधी रुपये किमतीचे शेकडो एकर डाळिंब, केळी अशी पिके वाया गेली आहेत.यामुळे या पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतकरी वगार्तून केली जात आहे.

अकोले-खुर्द येथील संपूर्ण परिसर हा उजनी धरणाच्या बॅकवॉटर पाण्यामुळे शंभर टक्के बागायत झालेला भाग आहे.या ठिकाणी ऊस,केळी,डाळिंब,पेरू यासह टोमॅटो,ढोबळी मिरची अशी भाजीपाल्याची पिके मोठ्या प्रमाणात घेतली जात आहेत.चालू वर्षी मे मध्ये झालेल्या अवकाळी पावसाने हाहाकार उडविला. तेव्हापासून सलग पाऊस पडत आहे.या पावसाने कमी अधिक प्रमाणात नुकसान झाले होते.मात्र त्यापेक्षा जास्त शेतकऱ्यांना या पावसाचा लाभ झाला होता. मात्र सध्या सुरू असलेला पाऊस अतिशय हानिकारक आहे. मोठ्या प्रमाणात पाणी पडत आहे.शेतकऱ्यांची डाळींब, केळी व इतर पिके काढणीस आलेली आहे.तसेच या पिकासाठी शेतकऱ्यांनी लाखो रुपये खर्च केलेले आहेत.

आठवड्यापासून दररोज तुफान पाऊस पडत असल्याने फळबागेत पाणी साचून राहत आहे. यामुळे तयार झालेले डाळिंब, केळी व पेरू हे पीक वाया जात आहे. फळे सडून जाऊ लागली आहेत.यामुळे शेतकऱ्यांची धाकधुक वाढल्याने शेतकऱ्यांची मानसिक स्थिती बिघडली आहे.पिके वाया जाऊ लागल्याने लाखो रुपयांची कर्जे कशी फेडायची अशी शेतकऱ्यास धास्ती वाटत आहे.

यामुळे शासनाने पावसाचे पाणी साचून या पाण्यामुळे वाया गेलेल्या पिकांचे तातडीने पंचनामे सुरू करावेत अशी मागणी करण्यात येत आहे.

# पूर्ण क्षमतेने कारखान्याला ऊस द्यावा - जयसिंह मोहिते-पाटील




**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षी साखर कारखाना आता कर्जमुक्त झालेला आहे. त्यामुळे आपण यावेळी जिल्ह्यात सर्वाधिक दर देणार आहे. सभासदांनी पूर्ण क्षमतेने या कारखान्याला आपला ऊस द्यावा, असे आवाहन कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी केले आहे. सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याची ६५ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवारी पार पडली. सभेपुढे मांडण्यात आलेल्या सर्व १३ विषयांना सभासदांनी एकमुखाने मंजुरी दिली.

यावेळी मोहिते-पाटील म्हणाले, शासन उसाच्या उपलब्धतेचा अभ्यास न करता नव्या कारखान्यांना उभारणीसाठी तर जुन्या कारखान्यांना विस्तारवाढीसाठी परवानगी देत आहे. त्यामुळे गळीत हंगामाच्या काळात दराची स्पर्धा सुरू होऊन ऊस पळवापळवी होऊ लागली आहे.

आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील म्हणाले, सरकारने २०१९ मध्ये साखरेचा ३१०० रुपये दर ठरवून दिला होता. तो अद्यापही तसाच आहे. तो दर वाढवून ४१०० रुपये करावा. इथेनॉलच्या दरात ६ ते ७ रुपयांनी वाढ करावी, अशी मागणी आता सगळ्यांकडून होत आहे.

यावेळी गत हंगामात उसाचे दजेर्दार उत्पादन घेतलेल्या सभासद शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. कामगारांना १० टक्के बोनस जाहीर करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील, अर्जुनसिंह मोहिते-पाटील, विश्वतेजसिंह मोहिते-पाटील, कार्यकारी संचालक राजेंद्र चौघुले, सर्व आजी माजी संचालक, कामगार व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसामुळे माळशिरस तालुक्यातील शेती पिकांचे आतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने ओला दुष्काळ जाहीर करावा, असा ठरावही यावेळी करण्यात आला.

# खा.धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रयत्नाने विशेष रेल्वे सेवा सुरू



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशिल मोहिते-पाटील यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे, कोल्हापूर-कलबुर्गी-कोल्हापूर (गाडी क्र. 01451 व 01452) ही विशेष रेल्वे सेवा सुरू करण्यात आली आहे. या सेवेचा शुभारंभ (फ्लॅग ऑफ) सांगोला रेल्वे स्थानक येथे खासदार यांच्या सौभाग्यवती सौ. शितलदेवी धैर्यशिल मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रसंगी सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या सौभाग्यवती सौ. डॉ. निकिताताई देशमुख उपस्थित होत्या. यावेळी फ्लॅग ऑफ समारंभ, रेल्वे इंजिन पूजन व चालकांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला रेल्वे प्रशासनाचे अधिकारी, सांगोला शहर व तालुक्यातील नागरिक, शहीद अशोक कामटे संघटनेचे पदाधिकारी तसेच विविध नेतेमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या रेल्वे सेवेमुळे सांगोला तालुक्यासह परिसरातील नागरिकांना कोल्हापूर व कलबुर्गी या दोन्ही दिशांना प्रवासासाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे.

# आदिला नदी : जुन्या नदीची नव्यानं ओळख!

## शहरातील शाळांमधून सुरू करण्यात येणार जनजागृती उपक्रम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** यावर्षीच्या पावसाळ्याने पुनरुज्जीवित झालेल्या आदिला नदीला नवजीवन देण्यासाठी 'आदिला नदी : जुन्या नदीची नव्यानं ओळख' या जनजागृती उपक्रमाची शास्त्रीनगरमधील श्री समर्थ विद्यामंदिर येथून या उपक्रमाची सुरूवात झाली.

नदीचे ऐतिहासिक व पर्यावरणीय महत्त्व, पूर- महापूर, ढगफुटी सारख्या नैसर्गिक घटनांमागील कारणे तसेच नदी परिसर संवर्धनासाठी करता येणाऱ्या उपाययोजनांबाबत आदिला नदी व परिसर संवर्धन कृती समितीचे राजकिरण चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

'आदिला नदी व परिसर संवर्धन कृती समिती'च्या माध्यमातून इतिहास जपण्याबरोबरच समाजामध्ये जनजागृती शाळा पातळीवरूनच होण्यासाठी विशेष भर देण्यात आला.

शहरातील प्रत्येक शाळेतून नदी व परिसर संवर्धनाची जाणीव पोहोचविण्याचे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले असून, या मोहिमेला व्यापक जनसमर्थन लाभेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला. सोलापुरातील आदिला नदीचे नाव सर्वदूर पोहोचावे, तसेच परिसर संवर्धन आणि सुशिक्षित नागरिक निर्मितीसाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहनही या निमित्ताने राजकिरण चव्हाण यांनी केले.

या कार्यक्रमाला शाळेचे अध्यक्ष रवींद्रकुमार शिखरे, सचिव अरुण शिखरे, मुख्याध्यापिका सुधा शिखरे यांच्यासह मंजुषा मुळे, महादेव चौरे, परमेश्वर कलशेट्टी, श्रुती शिखरे, रुथम्मा भंडारे, वर्षा शेळके, ओमश्री चित्रावकर आदी शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा' अंतर्गत सोलापूर जिल्ह्यात विद्यार्थ्यांसाठी जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी विशेष मोहिम

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ४६ अन्वये समाजातील दुर्बल व वंचित घटकांच्या कल्याणासाठी राज्य शासन विविध योजना राबवत असून, महामानव राष्ट्रपुरुषांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने "राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा" कार्यक्रम दि. १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यात राबविण्यात येत आहे.

या सेवा पंधरवड्यात ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील प्रवेशित मागासवर्गीय विद्यार्थ्यांसह विविध व्यवसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या, परंतु त्रुटी पूर्तते अभावी प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांसाठी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीसाठी विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. संबंधित अर्जदारांना ईमेलद्वारे सूचना देण्यात आलेल्या असून, त्रुटी पूर्तता न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पचे आयोजन करण्यात येणार आहे.

या मोहिमेदरम्यान विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींसंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी संबंधित महाविद्यालयातील समान संधी केंद्रामार्फत वेबिनारचे आयोजन करण्यात येणार आहे. अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी सर्व माहितीची स्वतः खात्री करून योग्य कागदपत्रे अपलोड करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

जात प्रमाणपत्र पडताळणी समितीस दिवाणी न्यायालयाचे अधिकार असून, समितीच्या निर्णयाला फक्त मा. उच्च न्यायालयात आव्हान देता येते. त्यामुळे कोणत्याही अर्जदाराने खोटी कागदपत्रे सादर करू नयेत, त्रयस्थ व्यक्तीकडे संपर्क करू नये, अशा मध्यस्थी करणाऱ्यांच्या आमिषास बळी पडू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

सन २०२५-२६ मध्ये १ एप्रिलपासून महाराष्ट्रात सर्वाधिक १६,३७२ वैधता प्रमाणपत्रे ऑनलाइन निर्गमित करण्यात आली आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी आपापल्या महाविद्यालयात परिपूर्ण अर्ज सादर करून या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त रवींद्र कदम पाटील, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, सोलापूर यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी तातडीने मदत द्या



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून याला "ओला दुष्काळ" घोषित करावे, अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष आनंद काशीद यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री, पालकमंत्री, जिल्हाधिकारी व तहसीलदार यांना सादर करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, 15 मे 2025 पासून आजपर्यंत झालेल्या अतिवृष्टीमुळे पिके, फळबागा, जनावरे, घरे यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसानभरपाईसाठी सरकारने पुढील उपाययोजना तातडीने कराव्यात, अशा मागण्या करण्यात आल्या आहेतः

- शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी 50 हजार रुपये मदत द्यावी.
- फळबागधारकांना हेक्टरी 1.5 लाख रुपये मदत मिळावी.
- माती अथवा ताल वाहून गेलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी 2.5 लाख रुपये द्यावेत.
- जनावरे दगावलेल्या किंवा वाहून गेलेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी.
- घरे पडलेल्यांना प्रधानमंत्री आवास योजनेतून त्वरित घरकुल उपलब्ध करून द्यावे.
- ओढे-नद्यांचा प्रवाह धोकादायक झाल्यामुळे त्यांच्या दुरुस्ती व मजबुतीकरणासाठी उन्हाळ्यातील कामांची मंजुरी आताच द्यावी.
- शेतकऱ्यांची कर्जमाफी सरसकट करावी व नवीन कर्ज कोणत्याही अटीशिवाय द्यावे.
- कर्ज नसलेल्यांना सुद्धा सहानुग्रह अनुदान द्यावे.
- विद्यार्थ्यांची फी माफ करावी.
- बी-बियाणे खात्यामार्फत मोफत उपलब्ध करून द्यावेत.
- शेतमालाला कायमस्वरूपी हमीभाव द्यावा.
- पूर व अतिवृष्टीमुळे मृत्यू पावलेल्या व आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना 25 लाख रुपये मदत व शासकीय नोकरीत समावेश करावा.
- याशिवाय सर्व शेतकरी योजनांचा लाभ तातडीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

काशीद यांनी सांगितले की, "सरकारने तातडीने मदत केली नाही तर शेतकरी उभा राहणे कठीण होईल. ही जबाबदारी शासनाने पार पाडली पाहिजे."

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून मदत मिळावी

## किसन जाधवांनी केली उपमुख्यमंत्री पवारांकडे मागणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गेल्या काही दिवसांपासून सोलापूर शहर जिल्ह्यात अतिवृष्टी सुरू आहे उजनी आणि भीमा नदीत आणि सिना धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आल्याने शहर जिल्ह्यात महापूरस्थिती निर्माण झाली आहे. उजनी आणि सिना धरणांमधून सोडलेल्या पाण्यामुळे अनेक गावे पुराच्या पाण्यात सापडले आहेत शेकडो एकर शेतीचे नुकसान झालं अनेक घरांमध्ये पाणी शिरले आहे अनेक घरांची पडझड झाल्याने अनेक कुटुंब रस्त्यावर आले आहेत ही गंभीर परिस्थिती सोलापूर शहर जिल्ह्यामध्ये निर्माण झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीत लोकांचा मृत्यू देखील झाला दरम्यान गेल्या काही दिवसापासून अतिवृष्टीमुळे प्रभाग क्रमांक २२ मधील यतीम खाना, रामवाडी, लिमयेवाडी, धोंडीबा वस्ती, गैबीपीर नगर, विजापूर नाका, भीम नगर, कारगिल वस्ती, या परिसरात मोठ्या स्वरूपात मैलामिश्रित पाणी नागरिकांच्या घरात शिरले असून या परिसरात पावसाळी गटारी नसल्यामुळे पाण्याचा निचरा देखील व्यवस्थित होत नाही या भागात मोठ्या स्वरूपात मैलामिश्रित पाणी साचल्याने येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रभाग क्रमांक २२ मधील यतीम खाना येथे पावसाळी गटारीचे पाणी पाईपलाईन नवीन टाकणे आणि धोंडीबा वस्ती येथील नाल्याचे पडदी बांधणे या कामासाठी आपणाकडून निधी मिळावी तसेच तात्काळ या परिसरातील पंचनामे करून प्रशासनाकडून जास्तीत जास्त मदत मिळावी आणि या पुढील काळात अशी परिस्थिती उद्भवणार नाही याची काळजी घेण्यासाठी प्रशासनाला सूचना कराव्यात अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी बुधवारी पुना नाका येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी केली. यावेळी प्रसंगी माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, माजी नगरसेवक गणेश पुजारी, राष्ट्रवादी शहर उपाध्यक्ष निलेश कांबळे, शहर सरचिटणीस अभिजीत कदम, शहर संघटक माणिक कांबळे, वसंत कांबळे, आनंद गाडेकर आदींची उपस्थिती होती. यावेळी प्रभाग क्रमांक २२ मधील झालेल्या नुकसानीच्या संदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित आपत्कालीन व्यवस्थापन अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनी संपर्क करून तत्काळ या परिसरातील समस्याचे निराकरण करण्याच्या सूचना केल्या.तसेच काही दिवसापूर्वी रिक्षा चालक सतीश शिंदे बाळे पुलावरून वाहून गेले होते त्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत मिळावी अशी मागणी देखील यावेळी किसन जाधव आणि आनंद चंदनशिवे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली. यावेळी बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त भागांचे पाहणी केले अजित पवार हे थेट शेतात उतरले आणि शेतकऱ्यांशी संवाद साधला यावेळी त्यांनी प्रशासनाला झालेल्या नुकसानीची तत्काळ पंचनामे करून मदत द्यावी मदत मिळण्यासाठी कुठलीही दिरंगाई प्रशासनाकडून होऊ नये अशा कडक शब्दात त्यांनी सूचना दिल्या.

# खा. प्रणिती शिंदे यांची शिवनी गावातील पूरग्रस्त नागरिकांशी भेट घेऊन विचारपूस



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** खासदार प्रणिती शिंदे यांनी डॉक्टर भैय्यासाहेब वळसंगकर प्रशाला, तिऱ्हे येथे सीना नदीकाठच्या पुरामुळे स्थलांतरित झालेल्या शिवनी गावातील नागरिकांची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली.

शिवनी गावातील नागरिकांनी खासदारांना दूरध्वनीद्वारे कळवले की, गावाला पुराने वेढा दिला असून सुमारे 15 ते 20 कुटुंबांना प्रशासनाने काल रात्रीच वळसंगकर प्रशालेत स्थलांतरित केले आहे. याशिवाय अनेक नागरिक बैल-गुरांसह हिरज हद्दीतील शिवारात अडकले असून त्यांची सोय करावी तसेच गावातून बाहेर पडण्यासाठी बोटीची सोय उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली.

या तक्रारीवर तत्काळ प्रतिसाद देत खासदार प्रणिती ताई शिंदे यांनी जिल्हाधिकारी साहेबांशी संपर्क साधून एनडीआरएफची टीम शिवनीला पाठवावी, अशा सूचना दिल्या. यावेळी त्या म्हणाल्या, लोकांनी घाबरून न जाता खंबीरपणे या नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा. मी सदैव तुमच्या पाठीशी उभी आहे.

यावेळी गावचे सरपंच गोवर्धन जगताप, तालुका अध्यक्ष भारत जाधव, माजी सरपंच नेताजी सुरवसे, जिल्हा समन्वयक मनोज यलगुलवार, ग्रामपंचायत सदस्य बबलू सुरवसे, स्वप्निल आगलावे, अक्रम पठाण, कुमार सुरवसे व ग्रामसेवक मॅडम उपस्थित होते.

तसेच खासदारांनी जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांशी बोलून स्थलांतरित झालेल्या सर्व नागरिकांची वैद्यकीय तपासणी करून गरज असल्यास औषधोपचार करावेत, अशा सूचनाही दिल्या. रात्रीच्या निवासासाठी चादरींची सोय करून देण्यात येईल, असेही त्यांनी आश्वासन दिले.

# उमेदवार निवडीसाठी जिल्हा पातळीवर कौशल्य स्पर्धांचे आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सन २०२६ मध्ये शांघाई येथे होणाऱ्या जागतिक कौशल्य स्पर्धेच्या पूर्वतयारीसाठी जिल्हा कौशल्य विभागाच्या वतीने राज्य व राष्ट्रीय पातळीवर कौशल्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, सेक्टर स्कील कौन्सिल आणि विविध औद्योगिक आस्थापनांच्या सहकार्याने एकूण ६३ क्षेत्रांमध्ये ही स्पर्धा घेण्यात येणार आहे.

या स्पर्धांचे आयोजन जिल्हा, विभाग, राज्य व देश पातळीवर करण्यात येणार असून निवड झालेल्या उमेदवारांची नावे जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येतील. जागतिक स्पर्धेसाठी वयोमर्यादा हा एकमेव निकष असून खालीलप्रमाणे पात्रता निश्चित करण्यात आली आहेः

- १३ क्षेत्रांकरिता (उदा. Additive Manufacturing, Cloud Computing, Cyber Security, Digital Construction, Mechatronics, Robot System Integration, Industry 4.0 इत्यादी) : उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००१ किंवा त्यानंतरचा असावा. - इतर ५० क्षेत्रांकरिता : उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा त्यानंतरचा असावा. या स्पर्धेसाठी पात्र उमेदवारांची नोंदणी खालील संस्थांमधून करता येईल.

शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, एमएसएमई, टूल रूम्स, सिपेट, आयआयटी, अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालये, आयएचएम/हॉस्पिटॅलिटी इन्स्टिट्यूट्स, कॉर्पोरेट टेक्निकल इन्स्टिट्यूट्स, स्किल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट्स, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, एमएसबीव्हीईटी, फाइन आर्ट्स कॉलेज, फ्लॉवर ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, इन्स्टिट्यूट ऑफ ज्वेलरी मेकिंग तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी अधिनस्त सर्व व्यवसाय प्रशिक्षण संस्था.

नोंदणीसाठी इच्छुक उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in या वेबपोर्टलला भेट देऊन ३० सप्टेंबर २०२५ पूर्वी आपली नोंदणी पूर्ण करावी. जिल्ह्यातील सर्व संबंधित संस्थांनी पुढाकार घेऊन ही माहिती अधिकाधिक उमेदवारांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन सहायक आयुक्त संगीता खंदारे (जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर) यांनी केले आहे.